# श्री स्वामी समर्थाष्टक

असे पातकी दीन मी स्वामीराया
पदी पातलो सिध्द व्हा उध्दराया
नसे अन्य त्राता जगी या दीनाला
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला ।।१।।

मला माय ना बाप न आप्त बंधू
सखा सोयरा सर्व तू दीन बंधू
तुझा मात्र आधार या लेकराला
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला ।।२।।

नसे शास्त्र विद्या कलादीक काही
नसे ज्ञान, वैराग्य ते सर्वथा ही
तुझे लेकरू ही अहंता मनाला
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला ।।३।।

प्रपंची पुरा बध्द झालो दयाळा
तुझा दास मी ही स्मृती मनाला
क्षमेची असे याचना त्वत्पदाला
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला ।।४।।

मला काम क्रोधाधिकी जागवीले
म्हणोनी समर्था तुला जागवीले
नको दूर लोटू तुझ्या सेवकाला
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला ।।५।।

नको अंत पाहू त्वरे धाव घेई
तुझ्यावीण नाही दूजी श्रेष्ठ आई
अनाथासि आधार तुझा दयाळा
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला ।।६।।

कधी गोड वाणी न येई मुखाला
कधी द्रव्य ना अर्पिले याचकाला
कधी मूर्ती तुझी न ये लोचनाला
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला ।।७।।

मला एवढी घाल भिक्षा समर्था
मुखे नित्य गावी तुझी गुण गाथा
घडो पाद सेवा तुझ्याकिंकराला
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला ।।८।।